मंत्रालयीन प्रशासकीय विभागातून निर्गमित होणारे शासन निर्णय / परिपत्रके / आदेश / अधिसूचना शासनाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणे तसेच संकेतस्थळ अद्यावत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण- २०१७ /प्र. क्र.२११/१८ (र. व का.)

मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १७ जानेवारी, २०१८

वाचा :- १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : मातंस - २०१०/प्र. क्र. ७८/३९, दिनांक २२ एप्रिल, २०१०,

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : संकीर्ण - २०१७ / प्र. क्र. ११७/१८ (र. व का.), दिनांक २० जुलै, २०१७,

परिपत्रक :

शासनाचे मुख्य संकेतस्थळ तसेच विभागाच्या संकेस्थळावरील माहिती अद्ययावत ठेवण्याबाबत दिनांक २२ एप्रिल, २०१० च्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन निर्णय / परिपत्रके / अधिसूचना शासनाच्या संकेस्थळावर अपलोड करण्याची दक्षता घेण्याबाबत दिनांक २० जुलै, २०१७ च्या परिपत्रकान्वये सर्व विभागांना सूचित करण्यात आलेले आहे.

२. तथापि असे निदर्शनास आले आहे की, काही संकेतस्थळावरील माहिती अद्यापि अद्ययावत करण्यात आलेली नाही. तसेच शासनाकडून निर्गमित झालेले अनेक शासन निर्णय / परिपत्रके / अधिसूचना संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेल्या नाहीत. सबब पुन्हा सूचित करण्यात येते की, संकेतस्थळ अद्ययावत करण्याबाबत तसेच यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले तसेच यापुढे निर्गमित होणारे सर्व शासन निर्णय / परिपत्रके / अधिसूचना शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत याची सर्व विभागांनी खातरजमा करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेताक २०१८०११७१४५५३३६३०७ असा आहे. तसेच डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagwan Muralidhar Sahai

Digitally signed by Bhagwan Muralidhar Sahai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=57dd6ec1681532b63c78bdc2d0f79ab4b9efccc6814de3df1f59d557777b3c45, cn=Bhagwan Muralidhar Sahai
Date: 2018.01.17 15:03:38 +05'30'

(डॉ. भगवान सहाय)
अपर मुख्य सचिव (प्र. सु. र. व का.)

प्रति,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
३. मा. राज्यपालांचे सचिव,
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
६. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
७. मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
९. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१०.प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
११.प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,
१२.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१३.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१४.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१५.मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१६.राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई,
१७.सर्व विभागीय आयुक्त,
१८. सर्व जिल्हाधिकारी,
१९.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२०.सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख /
२१.प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
२३.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२४.निवड नस्ती (कार्यासन १८).